Impact Factor – 6.625
E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal
April 2020 Special Issue -247



Corona Wariors, Our Real Super Heroes

Stay Home Stay Safe Stay Alive

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
M.S.G. Arts, Science & Commerce
College, Malegaon Camp,
Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | मराठी नाटकातील महात्मा गांधीचे विचार | डॉ. अंजली मस्करेन्हस | 313 |
| 59 | बारोमास : ग्रामीण वास्तवाचे दाहक दर्शन | डॉ. प्रवीण कारंजकर | 317 |
| 60 | अण्णाभाऊ साठे यांच्या वाङ्मयातील लोकसंस्कृती | डॉ. लता आंदे | 322 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मचिकित्सा | सुनील वाघमारे, डॉ. भाऊसाहेब अदमाने | 326 |
| 62 | भारतीय स्वातंत्र्याचे क्रांतिसुक्त : पोवाडा | डॉ. राजेंद्र वाटाणे | 332 |
| 63 | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र : परस्पर संबंध | डॉ. भास्कर शेळके | 337 |
| 64 | प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये योग शिक्षणाविषयी असलेल्या जाणीव-जागृतीचा अभ्यास | डॉ. राहुल सनेर, डॉ. तुषार माळी | 346 |
| 65 | महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा जिल्हा निहाय लोकसंख्येचा अभ्यास – एक दृष्टीकोन | प्रा. डॉ. आर.एम. वाडिले | 352 |
| 66 | इतिहास लेखनात द. बा. महाजन यांचे योगदान | डॉ. सिद्धार्थ जाधव | 357 |
| 67 | मुघल दरबारातील बातमीपत्रातून दिसून येणारा मुघल मराठा संघर्ष (इ.स.१६८०- १७०७ ) मराठवाड्याच्या विशेष संदर्भात | डॉ. सुनील पुरी | 361 |
| 68 | तणावाचे व्यवस्थापन | प्रा. गिरीश गवई | 368 |
| 69 | श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारे संचालित महाविद्लायांचे विद्यापीठ स्पर्धेतील व संस्था अंतर्गत सांघिक यशाचे विश्लेषण | प्रा. देवेंद्र वानखडे | 371 |
| 70 | राजकीय आधुनिकीकरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 377 |
| 71 | ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स : आजच्या ग्रंथालयाची गरज | प्रा. राजेश गेडाम | 382 |
| 72 | मेळघाट या दुर्गम क्षेत्रातील कोरकू आदिवासी संगीत संस्कृतीचे संक्षिप्त अध्ययन | डॉ. सारिका श्रावणे | 389 |
| 73 | साठोत्तरी मराठी नाटकातील सामाजिकता | डॉ. नितीन मोटे | 393 |
| 74 | यशवंतराव चव्हाण यांचा राष्ट्रीय संरक्षणविषयक दृष्टीकोन | डॉ. बाबासाहेब मोताळे | 399 |
| 75 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोन | डॉ. शुभांगी लुंगे | 404 |
| 76 | महात्मा फुले आणि सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्य | प्रा. राजेश्वर दुडूकनाळे | 409 |
| 77 | महाराष्ट्रातील मच्छीमारांच्या समस्या – उपाय | डॉ. अंजली मस्करेन्हस | 414 |
| 78 | कोरोनाग्रस्त भारतीय अर्थव्यवस्था | डॉ. ए. डी. गोस्वामी | 419 |
| 79 | शेतीत सुक्ष्मसिंचनाबरोबरच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची गरज | डॉ. दिपा होळकर | 424 |
| 80 | प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार | डॉ. भास्कर शेळके | 430 |
| 81 | राजकीय संसूचन – एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 433 |
| 82 | मुलाखत : संवादाचे महत्त्वाचे माध्यम | डॉ. भाऊसाहेब गमे | 440 |
| 83 | लोकसंस्कृतीचे उपासक - चित्रकथी आणि माकडवाले | डॉ. किरण पिंगळे | 445 |
| 84 | مرائھی غزل تعارف اورآغاز و ارتقاء | ڈاکٹر قریشی عتیق احمد عبدالقدوس بنگولوی | 450 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.* - मुख्य संपादक, रिसर्च जर्नी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April - 2020

# अण्णा भाऊ साठे यांच्या वाड्मयातील लोकसंस्कृती

प्रा. डॉ. एल. डी. आंदे
शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स् कॉलेज, वाघोली.
ता. कोरेगाव, जि.सातारा. ४१५५२५
andelata67@gmail.com
मो. ९४२०८०८९६१

समाजात आजही जातीव्यवस्था अत्यंत बळकट आहे. जातीमध्ये अनेक पोटजातीचे अस्तित्व अजूनही टिकवून ठेवण्यासाठी लोक धडपडत आहेत. तत्कालीन परिस्थितीचे वर्णन अण्णा भाऊ साठे यांच्या वाड्मय साहित्यातून व्यक्त झालेले आहे. ते पुढीलप्रमाणे : प्रभाकर मांडे यांच्या मते व्यक्ती निर्मित वाड्मयकृतीत किंवा कलाकृतीत अपरिहार्यपणे लोक साहित्यतत्व किंवा लोकतत्व असे म्हणतात.[१]

आजही आपल्याला दिसते की समाजात पुन्हा 'लोक' वर्ग अस्तित्वात आहे. हा वर्ग आदिम काळापासून समाजात असलेल्या रूढी–परंपराचे अतिशय निष्ठेने पालन करतो. नवस बोलणे, उत्सव, जत्रा–यात्रा मनोभावे करणे, बोकड–कोंबडयाचा बळी देणे, सृष्टितील विविध घटकांना विनम्रभावे प्रार्थना करणे ही त्यांच्या जीवनातील तत्वे आहेत. म्हणूनच ती 'लोकतत्वे' आहेत. रूढी हे एक संस्कृतीचे अंग होय. व्यक्ती–व्यक्तीमधील दैनंदिन, प्रासंगिक अशा वारंवार घडणा–या क्रियेला सुलभता लाभावी म्हणून काही संकेत सहजगत्या निर्माण होतात. त्याचे रूपांतर कालांतराने रूढीमध्ये होते. रूढी म्हणजे अलिखित नियमच होत.

विठ्ठल वाघ यांच्या मते, 'लोक नवस बोलतात, फेडतात. आयुष्य अशाच श्रध्दा छायेखाली जात असते. मृत्यूनंतरही हे विधि विधान सरता सरत नाही. दसवे, तेरावे, वर्षश्राध्द त्यावाचून जणू कुणाचाही आत्मा संतुष्ट होत नाही.[२]

१.आवडी. :

अण्णा भाऊ साठे यांची आवडी ही कादंबरी श्रेष्ठ कादंबरी आहे. या कादंबरीत गावागावातील जातीप्रथेचा प्रश्न मांडला आहे. जातीव्यवस्थेतून निर्माण झालेली श्रेष्ठत्वाची भावना, दर्प, कुळाची प्रतिष्ठा आणि यातून स्त्रियांचा होणारा कोंडमारा आणि षेवती कुटुंबाची झालेली वाताहात हा 'आवडी' या कादंबरीचा विषय आहे. मुलीचे सुख,तिचे प्रेम यापेक्षा जातीव्यवस्था प्रबळ ठरते. की, प्रतिष्ठा जपण्यासाठी आवडीचे लग्न लावून दिले जाते. पुढे धनाजीबरोबर तिचे पळून जाणे म्हणजे कुळाला बट्टा असे त्यांना वाटते. कुळाचा पोकळ डौल,जातीची घट वीण जपण्यासाठी माणसे कोणत्या थराला जाऊ शकतात. हे या कादंबरीत दर्शविले जाते. लोकमाणसाचे दर्शन या कादंबरीतून दिसते.[३]

आवडीची दर्दभरी कथा नागूच्या नीच' वागणूकीतून घडली आहे. आवडी आपली कथा मांडते. तेव्हा तात्या तिला म्हणतो, बाळ आवडे नशिबी व्हतं ते घडलं

'भाडं बदलता येत, पण नवरा बदलता येत न्हायं ,
आणि मुलीचा जन्म निराळा असतो ,
तिला दिल्या घरी न्हाय तर व्याल्या घरीच मेलं पायजे,
तिला मरण्यासाठी तिसरी जागाच नसती '[४]

२. 'चिखलातील कमळ' :

अण्णा भाऊची 'चिखलातील कमळ' ही कादंबरी आहे. या कादंबरीत मराठी संस्कृतीतील मुरळी प्रथेतील व्यथा, मुरळीवर होणारा सामाजिक अन्याय मांडणारी कादंबरी आहे. [५] जर मुल जगत नसेल तर खंडोबाला नवस बोलला जातो. पहिले मूल–मुलगा असेल तर वाघ्या म्हणून आणि मुलगी असेल तर मुरळी म्हणून खंडोबाला वाहिले जाते. खर तर ही जीवघेणी प्रथा आहे. मुरळीचा चांगल्याप्रकारे जगण्याचा हक्कच हिरावून घेतला जातो. उदा.तुळसा एक सुंदर मुरळी

३. 'फकिरा' :

अण्णा भाऊची 'फकिरा' ही लोकप्रिय कादंबरी आहे. 'फकिरा' आणि अण्णा भाऊ असे समीकरणच मराठी वाङ्मयात तयार झाले आहे. 'फकिरा' ही पहिली प्रादेशिक कादंबरी आहे. या कादंबरीतून वारणाकाठचे लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे दर्शन 'फकिरा' या कादंबरीतून घडते.[६]

शिगाव आणि वाटेगाव या दोन गावात जोगणीमुळे कसा संघर्ष निर्माण झाला आहे, असे चित्रण यात आहे. 'जोगणी' आपल्या गावात असणे अस्मितेचे, प्रतिष्ठेचे, शूरत्वाचे मानले जाते व पंचक्रोशातील दबदबा निर्माण होतो. 'जोगणी' बद्दल माहिती देतांना मच्छिंद्र सकटे म्हणतात. 'जोगणी' हा बारा बलुत्यांचा खेळ आहे. दोन बलुती नवरा–नवरी होत असतात. त्यांची वरात निघत असते. नवरीजवळ असलेली खोब–याची वाटी पिवळया फडक्यात असते. जर ती खोब–याची वाटी कुणी पळविली तर त्या गावची जत्रा बंद होते. आणि ती वाटी ज्या गावात जाईल त्या गावात जोगणीची जत्रा भरते. पण ही खोब–याची वाटी पळविणारा जर आपल्या हद्दीत वेशीच्या आत गावक–यांना सापडला, तर त्याचे डोके उडवायचे असाही रिवाज असतो.[७]

आपल्याकडे असलेली 'जोगणी' जीवापलीकडे जपणे आणि जीवावर उदार होऊन 'जोगणी' पळवून आणणे या मागील श्रध्दाभाव, लोकमानस आपल्या लक्षात येते. शिगावच्या जोगणीच्या जत्रेचे वर्णन अण्णा भाऊनी अतिशय समर्थपणे या कादंबरीत केल्याचे दिसते. या कादंबरीतून लोकसंस्कृती आणि लोकमाणसाचे दर्शन घडते. हा समुहमनाचा आविष्कार आहे. लोकमाणसातील संवेदनशीलता इथे आपल्याला प्रत्ययाला येते. व्यक्तीगत श्रध्दा आणि धर्मश्रध्दा लक्षात येते. बारा बलुतेदाराचा सहभाग, श्रध्दा, संवेदनशीलता, अशुभाचे संकेत पाळणे अशा लोकमानसातील अनेक गोष्टीचे दर्शन घडते.

फकिराचे वैशिष्टये सांगतांना मधूकर वाकोडे लिहितात :लोकमानसातील संवेदनशीलतेची 'फकिरा' ही अतिशय रानवट व रासवट कामगिरी होय. हीच संवेदनशीलता जशी व्यक्तीगत श्रध्दांना जन्म देते.तशीच अनेक पातळयावरील धर्मश्रध्दानाही जन्म देते. राणूजीचे पोवाडे निर्माण होणे सत्याबाच्या श्रध्देपोटी लोकगीतांचे पाझर फुटणे नि फकिराच्या शौर्याच्या कथा निर्माण होणे. हा त्या संवेदनशीलतेचा सारा होय. [८]

४: 'वैर'

या कादंबरीतून अण्णा भाऊनी गावातील परस्पर संबंधाचे दर्शन घडविले आहे. गावातील सण–उत्सव मनोवृत्ती याचे मिश्रण प्रस्तुत कादंबरीत येते. लोकमानस व लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारा एक प्रसंग पाहण्यासारखा आहे. या कादंबरीतील पांडू परिस्थितीने गरीब आहे. व जातीने रामोशी आहे आणि एका गुन्हेगाराचा बाप आहे. यापेक्षा तो वयाने मोठा आहे. त्याचा योग्य तो मान राखला पाहिजे.हा संस्कार या प्रसंगातून गुणावर होतो. पांडू गुणाला सूनबाई म्हणतो. तिच्या अब्रुची हमी घेतो. तर पांडू तुझा सासरा आहे. असे मुकिंदा गुणाला सांगतो. गावातील परस्पर संबंध कसे निकोप होते हे आपल्याला या कादंबरीतून दिसते.

५: 'प्रायश्चित' :

ही एक चटका लावणारी कथा आहे. या कथेतून नीतीमत्तेचे, भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. सुभद्रा आणि बळी हे दोघे बहिण–भाऊ ,लीला आणि उमा हे दोघे बहिण–भाऊ यांचे साटेलोटे होते. उमा आणि बळी दोघेही मुंबईत खुप कष्ट करत जगतात. पण दुर्दैवाने दोघांना दारूचे व्यसन जडते. एकदा अनर्थ घडतो. दारूच्या नशेत दोघेही आपापल्या घरात न जाता एकमेकांच्या घरात जातात. आपल्याच सख्या बहिणीच्या षेजेवर झोपून अनर्थ घडतो. हे पाहून दोषी तळयात जीव देतात. उमा झाडावर गळफास घेऊन आत्महत्या करतो. तर बळी सुरूंगाची बत्ती पेटवून पेटवून दगडाबरोबर स्वताच्या चिंधडया करून घेतो. या ठिकाणी भारतीय लोकसंस्कृती, लोकमानस, नीतीमुल्यांचा आदर दिसतो.त्यामुळेच सर्वांनीच प्रायश्चित घेतलेले आहे. [९]

६.'संघर्ष' :

या कादंबरीची नायीका सुलभा संसार उध्वस्त झाल्यामुळे दवाखान्यात परिचारिकेचे काम करते. योगायोगाने गावाकडील दाभाडे गृहस्थ तिथे अॅडमीट होतो. परक्या षहरात दाभाडे आपल्या गावाकडचा माणूस भेटल्याचा आनंद होतो. तिला त्याची भिती वाटत असते. तो खुलासा करतो. तो म्हणतो तुमच्यासारखीच माझी बहिण आहे. तेव्हा तिला बरे वाटते. आडदंड,पैलवान, रानगट माणूस पण परस्त्रीकडे त्याची निर्मळ दृष्टी हे लोकसंस्कृतीचे वैशिष्टय आहे.

या जगात जशी चांगली माणसे आहेत. तशीच दुष्ट माणसंही आहेत. त्यामुळेच भावा–बहिणीचं प्रेमळ नातं जीवापाड जपणारे दिसतात. तसेच अवलंबून असणा–या बहिणीचा गैरफायदा घेणारे भाऊही अण्णा भाऊंनी चित्रित केले आहेत.

७. 'चित्रा':

या कादबरीची नायिका चित्रा आणि तिची बहिण सोना या अतिशय सुंदर असतात. वडिलाच्या माघारी आईने मोठया केल्या. पण मुलीचे लग्न जमत नव्हते. सखुबाईच्या भावाला म्हणजे कृष्णाला असे वाटते की, सखुबाईने लोकांचा रोजगार करण्यापेक्षा आपल्या घरात काम करावे आणि आपण सांगू ते ऐकावे, परंतु सखुबाई चिखलात रूतल्याशिवाय आपलं ऐकणार नाही म्हणून ती संकटात सापडल्याची तो वाट पाहतो. पुढे तिच्या मोठया मुलीला वेश्या बनवतो आणि चित्रालाही वेश्या बनवण्याचा डाव त्याच्या मनात असतो.

सख्या बहिणीने आपल्या कहयात राहावे यासाठी दुष्टाव्याने वागणारा कृष्णासारखा भाऊ ही आपल्याला लोकजीवनात पहायला मिळतो.

'आवडी' या कादंबरीत आवडीचा भाऊ नागुच तिचा खून करतो. समाजात सर्व प्रकारचे लोक आपल्याला दिसतात. त्यामुळेच अण्णा भाऊनी केवळ बहिणीचे हित पाहणारे भाऊ रंगवले नाहीत. तर दुष्ट मनोप्रवृतीचे भाऊही रेखाटले आहेत. हेच लोकजीवनाचे,लोकमाणसाचे लोकसंस्कृतीचे वैशिष्टय अण्णा भाऊच्या साहित्यात दिसते.

अण्णा भाऊ यांच्या वाड्मयातून अमृताचा कल्पनाबंध व्यक्त झाला आहे. अमृत म्हणजे संजीवनी मृत्यूच्या दारातून परत आणण्याचे सामर्थ्य अमृतात असते. अशी कल्पना आपल्याकडे रूढ आहे. खरंतर अमृत कोणीही पाहिलेले नाही. अमृत शिंपडून जिवंत करण्याचा कल्पनाबंध अनेक लोककथा व लोकगीतातून आलेला आहे. अण्णा भाऊच्या 'अमृत' या कथेमधून 'अमृत' कल्पनाबंध येतो. सर्पदंश झाल्यावरच औशध जिवाकडे असते. जिवाला नाग चावतो. निवेदकाला आराटीच्या मुळया आणायला सांगतो. दोन वर्षांनी हे औषध कळते.

त्या मुळया तो चावून चावून खातो आणि तो बरा होतो. ज्ञानेश्वरीत त्याचा उल्लेख आला आहे. त्या मुळया चावून खाल्याने माणूस वाचतो. म्हणून जिवा आराटीला 'अमृत' म्हणतो. [१०]

८. सण,उत्सव व जत्रांचे दर्शन :

सण, उत्स्व व जत्रा हा लोकसंस्कृतीचा प्राण आहे. जात–पात–धर्म विसरून सगळे एकत्र येतात. त्यामुळे सण,उत्सव व जत्रांची आतुरतेने वाट पाहत असतात. या सण, उत्स्व व जत्रांमधून लोकजीवनाचे, लोकमाणसाचे लोकसंस्कृतीचे अण्णा भाऊच्या फकिरा,वारणेच्या खो–यात आवडी व वैर अशा अनेक कादंब–यामध्ये सण, उत्स्व व जत्रांमधून सण,उत्सव व जत्रांचे दर्शन घडते. येळापुरातील महांगोळी सणाचं 'वैर' या कादंबरीत आले आहे. सणाचा आनंद, वातावरणातील उत्साह, ईर्षा, श्रध्दा, समजुती यांचे दर्शनच अण्णा भाऊ इथे घडवतात.

अण्णा भाऊ यांच्या साहित्यातून कपट,सूडबुध्दी,भूत, अमृत व स्वप्न इत्यादीचे दर्शन घडते. अण्णा भाऊच्या साहित्यातून जुण्याचा पराभव आणि नव्याचा विजय किंबहुना अंध्दश्रध्देला नाकारणारे आणि विज्ञानाकडे झुकणारी दृष्टी दिसते.

सारांश :

अण्णा भाऊच्या वाडमयातून लोकतत्व, लोकसंस्कृती व लोकजीवन व्यक्त झाल्याचे दिसून येते. अण्णा भाऊ साठेच्या 'आवडी' या कादंबरीतून जाती प्रथेचा प्रश्न मांडल्याचे दिसून येते. 'चिखलातील कमळ' या कादंबरीतून मुरळी प्रथेतील व्यथा व मुरळीवर होणारा सामाजिक अन्याय व्यक्त झाल्याचे दिसून येते. फकिरा कादंबरीतून वारणाकाठचे लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे दर्शन व्यक्त झाल्याचे दिसून येते. 'वैर' या कादंबरीतून गावातील परस्पर संबंधाचे दर्शन व्यक्त झाल्याचे दिसून येते. 'प्रायश्चित' या कादंबरीतून नायिका सुलभा हिचा संसार उध्वस्त झाल्याचे दिसून येते. 'भूताचा मळा' या कथेतून भूताचा कल्पनाबध्द व्यक्त झाल्याचे दिसून येते. 'पैलवानाचा गाव' या कथेतून पुरोगामी विचारसरणी व्यक्त झाल्याचे दिसून येते. 'मरीआईचा गाडा' या कथेतून लोकमाणसाची श्रध्दा व्यक्त झाल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ :


1. मांडे प्रभाकर 'लोकसाहित्याचे स्वरूप' गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद,१९९५ पृ.३३१
2. वाघ विठठल 'लोकसाहित्याचे स्वरूप' गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद,१९९५ पृ.३०
3. मोरे गिरीश 'परिवर्तनाचा जागर' निर्मिती संवाद,कोल्हापूर १४ एप्रिल २०१३,पृ७५
4. साठे अण्णा 'आवडी' नव महाराष्ट्र प्रकाशन, आ–२, १९७४, पृ.९७
5. मोरे गिरीश 'परिवर्तनाचा जागर' निर्मिती संवाद,कोल्हापूर १४ एप्रिल २०१३,पृ७५
6. गुरव बाबुराव 'अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन आ–५,नोव्हे.२०१४,पृ.४३
7. सकटे मच्छिंद्र 'अण्णा भाऊ साठे सत्यशोधक',प्रज्ञा प्रकाशन,कोल्हापूर, २००५,पृ.२८
8. वाकोडे मधूकर, 'लोकप्रतिमा आणि लोकतत्वे' पृ.३०
9. मोरे गिरीश 'परिवर्तनाचा जागर' पृ.७९
10. तत्रैव पृ. ८६